**पुनर्शपथेवर उलटतपास जाबदार यांचेतर्फे**

**विधीज्ञ श्री. एस. एस. मुतालिक यांच्यामार्फत सुरू**

१०. दि. १५/०६/२००३ रोजी डिझेल आणणेकरीता मी कारखान्याची जिप घेवून गेलो होतो. डिझेल आणणेकरीता मी त्यावेळी प्लॅस्टीक कॅन घेवून गेलो होतो. पेट्रोल पंप हा कारखान्याच्या मेन गेटबाहेर सांगली—माधवनगर रस्त्यावर आहे. त्याठिकाणी रिक्वीझीशन स्लिप द्यावी लागत होती. पेट्रोल पंपावर त्यावेळी माने कर्मचारी कामास होता. त्यावेळी माने जेवत असल्याने त्याने मला कॅनमध्ये डिझेल भरून घेण्यास सांगितले. मानेचे जेवण होईपर्यंत न थांबता डिझेल मी स्वत: भरून घेतले. डिझेल भरून झालेनंतर त्याचे उधारीचे बिल मी श्री. मानेकडून करून घेतले आणि सदर बिलावर मी सही केली होती. सदर बिलास **निशाणी सी—४८** देण्यात आला.

११. डिझेल घेतल्यानंतर मी एकटाच जिपमधून गेटजवळ आलो. गेटला मी सही करून एंट्री केली. डिझेलचा कॅन माझेसोबत होता. डिझेलची पावती मी गेटवर दाखविली होती. गेटवरील वॉचमनने माझेकडील डिझेलच्या कॅनची तपासणी केली. पावतीप्रमाणे गेटवरील कर्मचा—याने माझेकडील डिझेलच्या कॅनची तपासणी केली होती हे म्हणणे खरे नाही. गेटवर पावतीप्रमाणे २०० लिटर डिझेल कॅनमध्ये आढळून आले नव्हते. त्यावेळी त्यांना ८२ लिटर डिझेल कमी आढळून आले. गेटजवळ जी. आर. चव्हाण — सुरक्षा सुपरवायझर आणि गुरूराज गोटे, संपत माने, पांडुरंग घाडगे यांना बोलावून घेतले होते. त्यावेळी मी माझा जबाब जी. आर. चव्हाण — सुरक्षा सुपरवायझर यांचेकडे दिला.

१२. पावतीप्रमाणे डिझेल आणण्याची जबाबदारी माझी होती. सबब, डिझेलमधल्या तफावतीबाबत माझेकडे विचारणा करण्यात आली. पेट्रोल पंपावर

२०० लिटर डिझेलचे रक्कम रू. ४७३०/— चे बिल करण्यात आले होते व त्या बिलावर मी सही केली होती. सुरक्षा रक्षकांनी गेटवर पंचनामा केला होता.

१३. मला दि. १६/१०/२००३ रोजी कारखान्याने आरोपपत्र दिले होते. सदर आरोपपत्रास मी खुलासा दिला नव्हता हे म्हणणे खरे नाही. कारखान्याने मला ८२ लिटर डिझेलच्या अपहाराबाबत आरोपपत्र दिले होते. कारखान्याने माझी खातेनिहाय चौकशी केली. खातेनिहाय चौकशीमध्ये बचाव प्रतिनिधी म्हणून मी ॲड. के. डी. शिंदे आणि बशीर मुलाणी यांची नावे दिली होती. त्यावेळी चौकशी अधिकारी म्हणून ॲड. जगदाळे होते आणि त्यांचेसमोर मी हजर झालो होतो.

१४. माझेकडे अवजड वाहन चालविणेचा परवाना आहे. पंचनाम्यावेळी भगवान हिंदुराव पाटील आणि किरण जाधव आले होते हे म्हणणे खरे नाही. भगवान पाटील आणि किरण जाधव यांची नावे चौकशीत दिली होती हे म्हणणे खरे नाही.

१५. कारखान्याच्या व्हेईकल विभागात वेगवेगळी वाहने होती. त्यामुळे मला वेगवेगळी वाहने चालविणेचा अनुभव होता. व्हेईकल विभाग हा कारखान्यात मेन गेटच्या आतील बाजूस आहे. सदर वाहनांसाठी रिक्वीझीशन स्लिपव्दारे लागेल त्यावेळेस डिझेल आणले जात होते. दि. १५/०६/२००३ पूर्वी या पध्दतीने मी डिझेल आणले होते. गैरवर्तनाची चौकशी झालेनंतर कारखान्याच्या वतीने मला बडतर्फ करण्यात आले होते.

१६. कारखान्याने मला आरोपपत्र देण्यापूर्वी गैरवर्तनाच्या अनुषंगाने कारवाई केली होती हे म्हणणे खरे नाही. सन १९९७ साली लाच घेतल्याचा आरोप ठेवण्यात आला होता व न्यायालयीन प्रक्रियेव्दारे सन २००२ साली मी पुन्हा कामावर रूजू झालो होतो. कारखान्याचे स्थायी आदेश आणि त्यासंबंधीच्या जबाबदा—यांची माहिती मला होती. निर्वाह भत्त्याच्या वादाचा विषय प्रस्तुत कामी

नाही. माझे सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ५ मधील मजकुर वस्तुस्थिती झाकण्यासाठी चुकीचा नमूद केला आहे हे म्हणणे खरे नाही.

१७. मला बडतर्फ केल्यानंतर मी अवजड वाहन चालविणेचा व्यवसाय केलेला नाही. जयसिंगपूर आणि त्यालगत कर्नाटकचा भाग असल्याने तिथे अवजड वाहन चालविण्याची मुबलक कामे उपलब्ध आहेत. जयसिंगपूर येथे साखर कारखान्यात काम मिळविणेसाठी मी प्रयत्न केले नाहीत. दरम्यानच्या कालावधीत कुटूंबाचा उदरनिर्वाह माझी मुले चालवित होती हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. दरम्यानच्या कालावधीत मी उत्पन्न मिळविले आहे परंतु हेतुपुरस्सर सदरची बाब झाकण्यासाठी मी खोटी विधाने केली आहेत हे म्हणणे खरे नाही. कारखान्याने केलेली बडतर्फीची कारवाई योग्य व कायदेशीर आहे हे म्हणणे खरे नाही. माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही. कारखान्यात केलेले गैरवर्तन दडपण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती

**सही/—**

स्थळ : सांगली

( एस. जी. कोरे )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली.

दि. २३/०९/२०२५